
SIDDHI PUBLICATION

# सिद्धी प्रकाशन

श्रीनगर, नांदेड.

येथे सर्व प्रकारची पुस्तके, नियतकालिके व मासिके प्रकाशित केली जातील.
पुस्तकांसाठी ISBN नंबर उपलब्ध.

संपर्क : डॉ. राजेश गंगाधरराव उंबरकर, सौ.पल्लवी लक्ष्मण शेटे मो. 9623979067



G Pay PhonePe BHIM 9623979067

Worldwide International Inter Disciplinary Research Journal


MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor : 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 7, Vol. II, Issue- LII, 29 March 2022

## ECONOMY



- Editor -

Mrs. Pallavi Laxman Shete

Address for Correspondence

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905

SIDDHI
Siddhi Prakashan

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

A Peer Reviewed - Referred

Belanagar, Near Maroti Mandir, Taroda (Kh.) Nanded - 431605 (Maharashtra, India)

## Certificate of Publication

Indexed SJIF

Impact factor 7.419

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper / Article titled "Nashik Jhilyatil Jalsinchanacha Zalela Vikas" Ek Bhagolik Adhyayan (Maharastra) of Dr./Mr./Miss/Mrs. Bhaghvan Shambhan Nikam

It is peer reviewed and published in the issue ___ Vol. ___ in the month of ___

Thank you.

Pallavi

Editor in Chief
Pallavi L. Shete

# नासिक जिल्ह्यातील जलसिंचनाचा झालेला विकास" एक भौगोलिक अध्ययन. (महाराष्ट्र)

भगवान श्याम भाऊ निकम
सहयोगी प्राध्यापक, मसगा, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मालेगाव कॅम्प. (भूगोलशास्त्र विभाग)


**प्रस्तावना:**


**भूगोलाच्या मूलभूत दोन शाखा आहेत. त्यात प्राकृतिक भूगोल व मानवी भूगोल या मुख्य शाखांमध्ये संपूर्ण पर्यावरणाचा अभ्यास केला जातो.भूगोलाच्या विविध शाखांपैकी कृषी भूगोल ही एक अत्यंत महत्त्वाची शाखा मानली जाते. विषयास अनुसरून पाणी आणि जमीन या दोन्ही पर्यावरणीय घटकांचे अतूट नाते आहे. म्हणूनच भूगोल विषय तज्ञांनी अभि् क्षेत्रीय दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून जलसिंचनाच्या विविध वैशिष्ट्यांचा व विकासाचा वेगवेगळया अंगाने अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.**

प्रारंभीच्या काळात पिकासाठी आवश्यक असणाऱ्या पाण्याची गरज पूर्ण करणे एवढा जलसिंचनाचा मर्यादित उद्देश होता. परंतु आधुनिक शेतीत जलसिंचन ही एक गरज झाली आहे.जगातील व भारतातील सर्वच महत्त्वाच्या व मोठ्या नद्यांवर म्हणून धरणे बांधण्यात आली आहेत. हरितक्रांतीचे तत्व स्वीकारल्यानंतर जलसिंचनाचे महत्त्व अधिक वाढले आहे.

सिंचनामुळे शेती व्यवसायाचा विकास होऊन परिसरातील जनसामान्यांना रोजगार व आर्थिक सोबत काही निर्माण होऊ शकते, त्याबरोबरच जलसिंचनामुळे विविध पिकांचे वर्षभर अंमलबजावणी करता येते उदाहरणार्थ, ऊस कापूस भाजीपाला तेलबिया यासारख्या घटकांचा शेती क्षेत्रात अवलंब करता येऊ शकतो. म्हणूनच जलसिंचन हे शेतीसाठी संजीवनी आहे.राज्यात सतत उद्भवणारी पाणीटंचाई परिस्थिती विचारात घेऊन, सर्वांसाठी पाणी टंचाई मुक्त महाराष्ट्र 2019 अंतर्गत "जलयुक्त शिवार"अभियान राज्य शासनाने हाती घेतले आहे.डॉ. नॉल्स, यांच्या मते, जलसिंचनामुळे मानवी जीवन सुरक्षित बनते. त्याबरोबरच दर हेक्टरी उत्पादन वाढते. आणि जमिनीचे मूल्य देखील वाढते. म्हणूनच या आधुनिक काळामध्ये जलसिंचनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905



**उद्दिष्टे:** अभ्यास क्षेत्रातील जलसिंचनाचा विकास व जलसिंचनाची भूमिका, याचे विश्लेषण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून अभ्यास हाती घेण्यात आला आहे. अभ्यास क्षेत्रातील सिंचनाचे स्रोत, त्यांची क्षमता हे देखील अभ्यासणे हे एक उद्दिष्ट आहे.

**परिकल्पना:** क्षेत्रातील जलसिंचनाचा विकास म्हणजे कृषी विकास असे असले तरी, अभिक्षेत्रीय दृष्टिकोनातून विचार करता सर्व भागात जलसिंचनाचा लाभ सारख्या प्रमाणात घेतला जात नाही. सिंचनाची सुविधा सर्वत्र सारखी नाँही म्हणून प्रादेशिक भिन्नता आढळून येते, सर्व कृषी क्षेत्रात जलसिंचनाबाबत जागृतता दिसून येत नसल्यामुळे वरील परिकल्पना समोर ठेवून अभ्यास केलेला आहे.

**अभ्यास पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी लागणारी आकडेवारी प्राथमिक व दुय्यम साधनाद्वारे प्राप्त करण्यात आली आहे. संशोधन प्रकल्पासाठी क्षेत्र अभ्यास करताना सर्व अभ्यास क्षेत्रातील जलस्रोतांना भेट देऊन माहिती मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच, सामाजिक व आर्थिक समालोचनातून व कृषी विभागामार्फत व जलसिंचन विभागामार्फत प्रकाशित होणाऱ्या माहितीद्वारे व माहितीचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**अभ्यास क्षेत्राची भौगोलिक पार्श्वभूमी:**

**अ : विस्तार स्थान आणि विस्तार**

अभ्यास क्षेत्राचे स्थान सर्वसाधारणपणे महाराष्ट्राच्या उत्तरेला आहे. त्याचा विस्तार १९ अंश३५'आणि २० अंश ५२'उत्तर अक्षांश आणि ७३अंश१६'आणि ७४अंश १६'आणि ७४ अंश ५६'पूर्व रेखांश

नाशिक जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ१५५८२ चौरस किलोमीटर इतके आहे. एकूण क्षेत्रफळाच्या बारा टक्के भाग मालेगाव तालुक्याने व्यापला आहे. सर्वात कमी भाग 3 पूर्णांक 63% भाग पेठ तालुक्याने व्यापला आहे. बारा तालुक्यांनी पाच ते नऊ टक्के भाग व्यापला आहे नाशिक जिल्ह्याच्या उत्तरेला आणि पश्चिमेला डांग आणि सुरत जिल्हा आहे. उत्तरेला धुळे जिल्हा असून पूर्वेला जळगाव आणि औरंगाबाद जिल्हा आहे. दक्षिण पश्चिमेला ठाणे जिल्हा आहे. जिल्ह्यात एकूण 15 तालुके आहेत.

**अभ्यास क्षेत्राची प्राकृतिक रचना:**

नाशिक जिल्ह्याला लहान महाराष्ट्र म्हणून देखील संबोधले जाते,. सुरगाणा, पेठ, इगतपुरी या भौगोलिक प्रदेशाची प्राकृतिक रचना कोकण विभागासारखी आहे. तसेच सिन्नर, दिंडोरी, निफाड, बागलाण प्रत्येक रचना पश्चिम महाराष्ट्र सारखी आहे. येवला येवला, नांदगाव, चांदवड या भागाची प्राकृतिक रचना विदर्भाच्या प्राकृतिक रचनेसी मिळते जुळती आहे.

**प्रवाह प्रणाली किंवा नद्या:**

जिल्ह्यात उगम पावणाऱ्या बहुतेक नद्या ह्या डोंगराळ भागातून वाहत आलेल्या आहेत. नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने गोदावरी आणि गिरणा या मुख्य नद्या असून त्याचबरोबर त्यांच्या उपनद्या, इतर लहान नद्या सुद्धा जिल्ह्यातून मार्गक्रमण करत आहेत. पुढे वेगवेगळ्या नद्यांना मिळून शेवटी अरबी समुद्राला जाऊन मिळतात.

नाशिक जिल्ह्यातील प्रवाह प्रणाली तीन टप्प्यात दिसून येते.

१कोकणातील नद्या
२ गोदावरी आणि तिच्या उपनद्या
३ गिरणा आणि तिच्या उपनद्या

| अ.क्र | नदीचे नाव | लांबी (किमी मध्ये) | तालुका |
|---|---|---|---|
| १ | गोदावरी | १११ | नासिक निफाड |
| २ | गिरणा | ११४ | सुरगाणा बागलाण नांदगाव कळवण |
| ३ | वैतरणा | ४० | इगतपुरी |
| ४ | दारणा | ८० | इगतपुरी नासिक निफाड |
| ५ | कादवा | ७४ | दिंडोरी |
| ६ | मन्याड | ४८ | बागलाण मालेगाव |
| ७ | मौसम | ९८ | |

जिल्ह्यातील पाटबंधारे विषय सुविधा (राज्यस्तरीय पाटबंधारे)

जिल्हा नाशिक: संदर्भ वर्ष२०१९/२०

| अक्र | तालुका | लघु पाटबंधारे प्रकल्प(लाभ क्षेत्र. हेक्टर) | ओलिताखालील क्षेत्र (हेक्टर) | मध्यम (प्रकल्प (लाभ क्षेत्र एक्टर) | ओलिताखालील क्षेत्र (हेक्टर) | मोठे प्रकल्प(लाभक्षेत्र हेक्टर) | ओलिताखालील क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | सुरगाणा | ४६०७ | २९०६ | ० | ० | ० | ० |
| २ | कळवण | ९३१६ | ३७६४ | ० | ० | ५०५७ | ४८८४ |
| ३ | देवळा | ३०५६ | ८१३ | ० | ० | ८३०७ | ५२५१ |
| ४ | बागलाण | ५७९६ | २७६३ | १२०३८ | ५३३८ | ७५७२ | |
| ५ | मालेगाव | ९३६३ | ४९९५ | ६१२६ | १४०८ | ११५९३ | |
| ६ | नांदगाव | ६२५३ | ४२५६ | ४८१३ | ३७२० | ० | |
| ७ | चांदवड | ६०७७ | ३३४४ | ० | ० | ७०४२ | २१२३ |
| ८ | दिंडोरी | ६९२७ | ५६४६ | ११८ | ३१७.११ | १४३११ | १२१४० |
| ९ | पेठ | २०३१ | १०१५ | ० | ० | ० | ० |
| १० | त्रंबक | २८२६ | २२२५ | ६२२९ | ५३०.४९ | ० | ५१ |